महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे    Rs.2/-    कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 15 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 231 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## भाजपा जिल्हाध्यक्षांनी उधळा पदपथावर टपऱ्या थाटण्याचा प्रयत्न



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महापालिकेने मंजूर केलेल्या जागेऐवजी रस्त्यालगतच्या मोक्याच्या फूटपाथवर दोन टपऱ्या थाटण्याचा प्रयत्न भाजपाचे अध्यक्ष संजय वाघुले यांच्यासह कार्यकर्त्यांनी फोल ठरविला. भाजपा कार्यकर्त्यांच्या जोरदार विरोधानंतर मध्यरात्री दोनच्या सुमारास रात्रीचा खेळ करून ठेवलेल्या टपऱ्या कंत्राटदाराने हटविल्या. ठाण्याचा मानबिंदू असलेल्या 'तलावपाळी'च्या फूटपाथ व नौपाड्यातील सारस्वत बँकेसमोरील फूटपाथ मोकळा करण्यात भाजपा कार्यकर्त्यांना यश आले. सामान्य नागरिक व पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणार नाही, अशा पद्धतीने रस्त्यालगतच्या मोकळया जागेत स्टॉल वा टपऱ्या उभाराव्यात, असे उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत; परंतु ठाणे महापालिकेच्या काही अधिकाऱ्यांनी नियमावली गुंडाळून मोकळया जागांऐवजी चक्क फूटपाथवरच टपऱ्या बसविण्याचा घाट घातला आहे, असा आरोप भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केला. नौपाड्यातील सारस्वत बँकेसमोर व तलावपाळीतील फूटपाथवर काल मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास महापालिकेचा लोगो असलेले स्टॉल ठेवण्यात आले. एका ठिकाणी स्टॉल मंजूर करून प्रत्यक्षात मोक्याच्या ठिकाणी स्टॉल थाटण्याचा हा उद्योग होता. पादचाऱ्यांना अडथळा होतील, असे स्टॉल वा टपऱ्या ठेवल्याचे लक्षात आल्यानंतर, संजय वाघुले यांनी तत्काळ महापालिकेच्या संबंधित विभागांना तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. त्याची दखल घेऊन संबंधित कंत्राटदाराने पोकलेनच्या मशीनने हे स्टॉल हटविले. तूर्त सारस्वत बँकेसमोरील स्टॉल हटविला असून, तलावपाळी येथील स्टॉलही उचलणार असल्याचे कंत्राटदाराने मान्य केले.

## मुरबाडच्या धसईत पिसाळलेल्या श्वानाचा चिमुकलीवर हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : भटक्या श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही भटक्या श्वानांमुळे नागरिक भितीच्या छायेत आहेत. मुरबाड तालुक्यातील धसई गावात एका सहा वर्षाच्या मुलीवर पिसाळलेल्या श्वानाने हल्ला केला. या हल्ल्यात मुलीला गंभीर इजा झाली असून श्वानाने तिचा जबडा फाडला आहे. या मुलीवर सध्या उल्हासनगरच्या मध्यवर्ती रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

गेल्या काही दिवसात भटक्या श्वानांची वाढलेली संख्या नागरिकांसाठी त्रासदायक ठरू लागली आहे. शहरी भागात उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर शहरात भटक्या श्वानांच्या हल्ल्यांच्या घटना समोर आल्या आहेत. येथील स्थानिक पालिका प्रशासन भटक्या श्वानांच्या संख्येवर निर्बंध घालण्यात अपयशी ठरले आहेत. मात्र शहरासोबतच आता ग्रामीण भागातही भटक्या श्वानांची संख्या वाढल्याचे दिसून आले आहे. मुरबाड तालुक्यातील धसई गावात एका सहा वर्षीय मुलीवर भटक्या श्वानाने हल्ला केल्याने तीचा जबडा फाटला आहे.

आरुषी कनोजिया असे या मुलीचे नाव असून ती धसईच्या घोलप गावात राहते. गुरुवारी संध्याकाळी ती घरात खेळत असताना अचानक एका पिसाळलेल्या श्वानाने तिच्यावर हल्ला चढवला. यात तिचा जबडा पूर्णपणे फाटला असून श्वानाने तिचे अक्षरशः लचके तोडले आहेत. या घटनेनंतर आरुषीला आधी मुरबाडच्या उपजिल्हा रुग्णालय घेऊन नेण्यात आले होते. मात्र तिथल्या डॉक्टरांनी तिला उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. सध्या तिच्यावर मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ग्रामीण भागात भटक्या श्वानांचे हल्ले आणि संख्या रोखण्यासाठी कोणतीही योजना नसल्याने धसई परिसरात श्वानांचा सुळसुळाट झाला असून याकडे संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी यानंतर ग्रामस्थांमधून होते आहे

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाकुंभमेळ्यात




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रयागराज : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यांनी आज तीर्थराज प्रयागराज येथील महाकुंभमेळ्याला हजेरी लावली असून यावेळी त्यांनी सहकुटुंब महाकुंभ मेळ्यात पवित्र स्नान केलंय. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दि. (14 फेब्रुवारी) आपल्या नियोजित दिल्ली दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांसोबत बैठक घेतली. यावेळी राज्याचे मुख्य सचिव सुजाता सौनिक , अतिरिक्त मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्लादेखील बैठकीला हजर होते. यावेळी या बैठकीत नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात केंद्रीय गृहमंत्रालयात आढावा घेण्यात आला. या दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांसोबत बैठक घेतली. यावेळी राज्याचे मुख्य सचिव सुजाता सौनिक , अतिरिक्त मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्लादेखील बैठकीला हजर होते. यावेळी या बैठकीत नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात केंद्रीय गृहमंत्रालयात आढावा घेण्यात आला. दरम्यान, यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी तीर्थराज प्रयागराज येथील महाकुंभमेळ्याला हजेरी लावली. यावेळी त्यांनी सहकुटुंब महाकुंभमेळ्यात पवित्र स्नान आणि पूजा अर्चना केली.

### आस्थेचा कुंभ.. महाकुंभ

सनातन संस्कृतीची अविरत परंपरा..! तीर्थराज प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात पवित्र स्नान करण्याचे अहोभाग्य.. अशा आशयाची पोस्ट शेयर करत मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गंगेत डुबकी मारत पवित्र स्नान केलं. यावेळी पत्नी अमृता फडणवीस आणि मुलगी देखील उपस्थित होती.









# राज्यातील कायदा सुव्यवस्थेत आमूलाग्र बदल

## अमित शहा यांच्यासोबत देवेंद्र फडणवीस यांची बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गतिमान आणि प्रगतीशील कायदा-सुव्यवस्था उभी करणार!अमित शहा यांच्यासोबत देवेंद्र फडणवीस यांची बैठकनवी दिल्ली, 14 फेब्रुवारीकेंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवीन फौजदारी कायद्यासंदर्भातील महाराष्ट्रातील अंमलबजावणीचा आढावा घेतला. या तीन कायद्याच्या अंमलबजावणीतून राज्यात गतिमान आणि प्रगतीशील कायदा-सुव्यवस्था उभी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे तीन नवीन कायद्यांच्या संदर्भात आढावा बैठक घेतली. या कायद्यांची राज्यात अंमलबजावणी कशा पद्धतीने होते आहे, त्यासाठी निर्माण करावयाच्या संस्थात्मक आणि पायाभूत सुविधांची स्थिती काय आणि किती प्रकरणे दाखल झाली याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य संहिता असे हे तीन कायदे आहेत. अलिकडेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, उत्तराखंड आणि हरयाणा या राज्यांकडून आढावा घेतला होता. आज महाराष्ट्राचा आढावा घेण्यात आला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु आहे. 27 मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन रुजू झाल्या असून, पुढच्या 6 महिन्यात संपूर्ण नेटवर्क तयार होईल. ज्या गुन्ह्यात 7 वर्षांपेक्षा जास्त शिक्षा आहे, अशा प्रकरणात आता मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनच्या माध्यमातून घटनास्थळीच न्यायवैद्यकीय परीक्षण केले जाणार आहे. यातून गुणवत्तापूर्ण पुरावे उपलब्ध होणार आहेत. राज्य पोलिस दलाच्या 2 लाखांच्या फोर्सपैकी 90 टक्के लोकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, उर्वरित 10 टक्के प्रशिक्षण सुद्धा 31 मार्चपूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.आरोपींना वारंवार कोर्टात फोर्स घेऊन जावे लागू नये, यासाठी नवीन कायद्यान्वये कारागृहात साक्षीसाठी क्युबिकल्स उभे करुन ते न्यायालयाशी ऑनलाईन जोडून देण्यात येणार आहेत. प्रत्येक कोर्टाचे विशिष्ट क्युबिकल असणार आहेत. 6 ते 8 महिन्यात हेही काम आम्ही पूर्ण करणार आहोत. पोलिस वाहन, सुरक्षेवरील ताण आणि न्यायालयातील गर्दी यामुळे कमी होणार आहे. नवीन कायद्यानुसार, वारंवार न्यायालयात तारखा मागता येणार नाही, याची तरतूद असल्याने सरकारी वकिलांना त्याचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे. अतिशय चांगले मार्गदर्शन आजच्या बैठकीत मिळाले आहे. हे तिन्ही कायदे लागू करण्यासंदर्भात अधिक वेगाने आम्ही काम करु, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.26/11 चा अपराधी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणासाठी अमेरिकेने होकार दिला, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मी अतिशय आभारी आहे. आम्ही गेल्यावेळी तहव्वूर राणाची ऑनलाईन साक्ष घेतल्यानेच या प्रकरणात पाकिस्तानचा सहभाग सिद्ध झाला. मुंबईवरील हल्ल्याच्या घटनेत अंतिम न्यायाची वेळ आता आली आहे. हा खटला मुंबईत चालणार असल्याने त्याला मुंबईतच आणले जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# ठाणे मनपाचा खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प रखडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: गेल्या पाच ते सहा वर्षात ठाणे महापालिकेच्या वतीने मोठमोठ्या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली आणि त्यात अपयशही आले. आता खाडीचे खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्पही पालिकेने गुंडाळला असून या प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदाराची अनामत रक्कम देखील परत करण्याची नामुष्की पालिका प्रशासनावर ओढवली आहे.

### प्रकल्पाची अनामत ठेकेदाराला परत करण्याची नामुष्की

**संपूर्ण प्रकल्प पीपीपी तत्वावर उभारला जाणार होता. परंतु यासाठी ठेकेदाराला जागा देऊन वीजेचे बिलही पालिका भरणार होती. याशिवाय प्रती हजार लीटरमागे ६३ रुपये खर्च करुन पालिका ते महागडे पाणी विकत घेणार होती. भविष्यातील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी पालिकेने खाडीतील पाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी शुध्द करुन त्याचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी करण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी १५ लाखांचा खर्च देखील सल्लागारांवर करण्यात आला आहे.**

वर्तमान आणि भविष्यात निर्माण होणारी पाणी समस्या लक्षात घेऊन महापालिकेने लोकप्रतिनिधींचा विरोध डावलून तत्कालीन पालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांच्या कार्यकाळात खाडीतील पाण्यावर प्रक्रिया करुन त्यापासून विविध कामांच्या वापरासाठी गोडे पाणी तयार करण्याचा प्रस्ताव मंजुर केला होता. विशेष म्हणजे हा प्रस्ताव त्यावेळी सत्ताधारी शिवसेनेने गोंधळात मंजुर करुन घेतला होता. तब्बल १५० कोटींचा अवास्तव खर्च असलेला हा प्रकल्प होता. त्यावेळी या प्रकल्पाविरोधात राष्ट्रवादीने न्यायालयात देखील धाव घेतली होती. दरम्यान कोरोना काळात पालिकेच्या तिजोरीवर परिणाम झाल्याने हा प्रकल्प गुंडाळण्यात आला. त्यानंतर या प्रकल्पाबाबत कोणत्याच प्रकारच्या हालचाली झालेल्या नाहीत. हे काम ज्या कंपनीला देण्यात आले होते, त्या संबंधित कंपनीने बँक गॅरंटी म्हणून ७.५ कोटी रुपयांची सुरक्षा अनामत रक्कम ठाणे महापालिकेकडे जमा केली होती. दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रकल्पाचे भागीदार मेयांनी एल डिसालिया वॉटर एस. या कंपनीने काही तांत्रिक कारणामुळे प्रकल्पाचे काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे अवघड वाटत असल्यामुळे प्रकल्पातून बाहेर पडण्याची इच्छा व्यक्त केली व मे. एल डिसालिया वॉटर एस यांच्या ठिकाणी मे. एक्वाटेक सिस्टीम प्रा.लि.यांना घेण्याबाबत कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यानंतर पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जॉईंट कमिटीची एक बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये प्रकल्पाचे भागीदार मे. डिसालिया वॉटर एस एल यांच्या ठिकाणी मे. एक्वाटेक सिस्टीम प्रा.लि.यांना घेण्याबाबत मंजूरी देण्यात आली. मे. डिसालिया वॉटर एस. एल ही कंपनी प्रकल्पातून बाहेर पडल्यामुळे त्यांना ठामपाकडे जमा करण्यात आलेली ७.५ कोटीची सुरक्षा अनामत बँक गॅरण्टी परत करण्यात आली आहे. तर नवीन कंपनी मे. एक्वाटेक सिस्टीम प्रा.लि.यांच्या वतीने ७.५ कोटीची सुरक्षा अनामत बँक गॅरण्टी महापालिकेकडे जमा करण्यात आली होती. या प्रकल्पाबाबत डिसेंबर २०२०च्या महासभेत काही प्रश्न उपस्थित करण्यात आले आणि हा प्रकल्प रद्द करण्याचा ठराव करण्यात आला.

हा प्रकल्प रद्द करण्यात आल्याने ज्या कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती, त्या कंपनीने अनामत रक्कम मिळावी म्हणून न्यायालयात धाव घेतली होती. अखेर न्यायालयीन बाजू तपासून अनामत रक्कम परत करण्यास ठाणे महापालिकेने तयारी दर्शवली आहे. त्यामुळे मोठ्या प्रकल्पाची घोषणा करणाऱ्या ठाणे महापालिकेला अनामत रक्कम परत करण्याची नामुष्की ओढवली असल्याची पालिका वर्तुळात चर्चा आहे.

# बदलापुरातील चामटोली येथे नदी स्वच्छता मोहिम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : वनशक्ती स्वयंसेवी संस्थेतर्फे बदलापूर येथील चामटोली, कोपऱ्याची वाडी आणि चिंचवली येथील ग्रामस्थांच्या सहकायनि, शनिवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते ११. या वेळेत उल्हास नदीची उपनदी असलेल्या नदी पात्रात स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले आहे. साचलेला अविघटनशील कचरा काढून टाकून नदीचे पर्यावरणीय आरोग्य जपणे, स्थानिक नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि शाश्वत कचरा व्यवस्थापन पद्धतींना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. तरी पर्यावरण प्रेमींनी उपस्थित राहून आणि मार्गदर्शनाने सहभागी स्वयंसेवकांना प्रेरित करून या कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित करावा. नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण करण्याच्या या सामूहिक प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यात आपला सहभाग मोलाचा ठरेलअसे आवाहन सागरशक्तीचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी नंदकुमार पवार यांनी केले आहे.

# भिवंडीतील गुन्हेगारी; ड्रग्स माफियांवर कारवाई करा

## बाळ्या मामांची अमित शहांकडे मागणी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन भिवंडीतील वाढत्या गुन्हेगारी आणि ड्रग्स माफियांच्या आतंकाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली. खासदार सुरेश म्हात्रे यांनी गृहमंत्र्यांना सांगितले की भिवंडीमध्ये गुन्हेगारी आणि अवैध ड्रग्स व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती गंभीर बनली आहे. ऑगस्ट 2024 मध्ये गुजरात एटीएसने भिवंडी येथून 792 किलो लिक्विड एमडी ड्रग्स जप्त केली होती, ज्याची किंमत 800 कोटी रुपये आहे, मात्र या प्रकरणातील प्रमुख दोषींवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. खासदार सुरेश म्हात्रे यांनी ड्रग्स माफिया, तडीपार गुन्हेगार आणि संघटित गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच, भिवंडीतील ड्रग्स व्यवसाय समूळ नष्ट करण्यासाठी विशेष तपास समिती किंवा केंद्रीय तपास यंत्रणेच्या चौकशीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. गृहमंत्री अमित शाह यांनी खासदार सुरेश म्हात्रे यांच्या मागण्या गांभीर्याने घेतल्या आणि तातडीने योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले.

# कामात कुचराई प्रकरणी आरोग्य विभागाचे पाच अधिकारी कर्मचारी निलंबित?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे जिल्हा परिषदेचे कर्तृत्वनिष्ठ, कार्यतत्पर,कर्तबगार,मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी कल्याण तालुका पंचायत आरोग्य विभाग अंतर्गत असलेल्या निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रातील तब्बल५कर्मचाऱ्यांना विना परवानगी गैरहजर राहिल्या प्रकरणी तडकाफडकी निंलबीत केल्याने जिल्हा परिषदे मध्ये खळबळ माजली आहे,ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे हे अतिशय हुशार, चाणाक्ष, आणि कर्तव्यनिष्ठ म्हणून परिचित आहेत, त्यांनी जिल्हा परिषदेचा कार्यभार स्वीकारल्यापासून विविध




**मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आरोग्य सहाय्यक जगन्नाथ धनगर, फार्मासिस्ट विनोद पवार, सिस्टर, श्रीमती चव्हाण, आरोग्य सेविका निलिमा पाटील, कनिष्ठ सहाय्यक, श्री हरड अशा ५ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे**

आढावा, बैठका, भेटी ने संपूर्ण जिल्हा पिंजून काढला आहे, ते अंत्यत, चाणाक्ष, हुशार असल्याने आढावा बैठकीत कोणाला कधी काय विचारतील याचा नेम नाही, त्यामुळे त्यांचा आढावा म्हटला की अधिकां-याचे काही खरे नसते, असाच प्रंसग नुकताच कल्याण तालुक्यात घडला,सीईओ श्री घुगे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंलगगड दौऱ्यासाठी अंबरनाथ, कल्याण, या परिसरात येणार होते, तरीही आजुबाजुला असलेले जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी गाफील राहिले, नेमकं याच वेळी सीईओ सरांनी प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे या केंद्रास भेट दिली, यावेळी या पीएससीला केवळ शिपाई उपस्थित होते, तर इतर कर्मचारी गैरहजर होते, त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आरोग्य सहाय्यक जगन्नाथ धनगर, फार्मासिस्ट विनोद पवार, सिस्टर, श्रीमती चव्हाण, आरोग्य सेविका निलिमा पाटील, कनिष्ठ सहाय्यक, श्री हरड अशा ५कर्मचाऱ्यांना निंलबित केले आहे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या या जबरदस्त दणक्यामुळे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे तर संपूर्ण जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सीईओ रोहन घुगे यांचा धसका घेतला आहे.

# गीतासार



तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥२- ६१॥

म्हणून साधकाने त्या सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवून, चित्त स्थिर करून, मनाला माझाच आधार देऊन ध्यानास बसावे. कारण इंद्रिये ज्या पुरुषाच्या ताब्यात असतात, त्याची बुद्धी स्थिर होते. ॥ २-६१ ॥

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।
सङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥२- ६२॥

विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाची त्या विषयात आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीमुळे त्या विषयांची कामना उत्पन्न होते. कामना पूर्ण झाल्या नाहीत की क्रोध म्हणजे राग येतो. ॥ २-६२ ॥

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥२- ६३॥

रागामुळे अत्यंत मूढता येते अर्थात अविचार उत्पन्न होतो. मूढतेमुळे स्मरणशक्ती भ्रष्ट होते. स्मरणशक्ती भ्रष्ट झाली की बुद्धीचा म्हणजे ज्ञानशक्तीचा नाश होतो. आणि बुद्धीचा नाश झाल्यामुळे माणसाचा अधःपात होतो. ॥ २-६३ ॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥२- ६४॥

परंतु अंतःकरण ताब्यात ठेवलेला साधक आपल्या ताब्यात ठेवलेल्या राग-द्वेष रहित इंद्रियांनी विषयांचा उपभोग घेत असूनही अंतःकरणाची प्रसन्नता प्राप्त करून घेतो. ॥ २-६४ ॥

## आरोग्य टिप्स

### हेल्दी वेगन पदार्थ

**१० पौष्टीक वेगन पदार्थ कोणते?**
चिया सिड्स, शेंगदाणे, फोर्टिफाईड मिल्क, बदाम, कडधान्ये, हिरव्या भाज्या, भात, सोया मिल्क, टोफू, ब्रोकोली. डॉक्टर सांगतात की एनर्जी, मसल्स आणि हार्मोनल बॅलेन्ससाठी प्रोटीन्स गरजेचे असतात. यात डाळी, टोफू, टेम्पेह अक्रोड, इतर बीयायुक्त पदार्थ, अन्नधान्य, प्लांट बेस्ड प्रोटीन पावडर, भाज्या यांचा समावेश आहे. हे पदार्थ शुद्ध शाकाहारी आणि व्हेगन असून फायबर्स, आयर्न, हेल्दी फॅट्स यांसारखी पोषक तत्व यातून मिळतात.

**वेगन डाएटचे फायदे**
वेगन डाएटमधून शरीराला आवश्यक असणारे घटक मिळतात. ज्यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. व्हिटामी बी-१२, व्हिटामीन डी, व्हिटामीन सी, व्हिटामीन ए या पदार्थांचा यात समावेश आहे. व्हिटामीन ए, व्हिटामीन ई, फॉलेट, व्हिटामीन के शरीराच्या चांगल्या कार्यासाठी गरजेचे असतात. प्लांट बेस्ड दूध, ब्रेकफास्ट सिरियल्स, संत्र्याचा रस, सीट्रस फ्रुट, स्ट्रोबेरी, किव्ही, गाजर, शकरकंद, फॉर्टिफाईड फूड, पालक, केल, कोलार्ड यांचा समावेश आहे.

अनेक असे पदार्थ आहेत ज्यांचा आहारात समावेश करून तुम्ही शरीरासाठी आवश्यक असणारे घटक मिळवू शकता. डाळी, टोफू, शेंगदाणे पालक, केल, टोफू, आयोडाज्ड मीठ, मॅग्नेशियम, हार्क चॉकलेट, बदाम, ब्राऊन राईस, क्विनोसा हे उत्तम पर्याय आहेत. वेगन डाएट अनेक प्रकारचे प्रोटीन्स,व्हिटामीन्स आणि मिनरल्स देऊ शते. जे संपूर्ण शरीराला निरोगी ठेवतात. या वेगवेगळ्या पदार्थांचा आहारात समावेश केल्याने शरीराला पोषक तत्व मिळतील.

# महाकुंभपर्वात हिंदु जनजागृतीचे प्रदर्शनाला युवकांचा प्रतिसाद

## कार्यात सहभागी होण्याची सिद्धता

हिंदु धर्मावर होत असलेले विविध आघात, हिंदु राष्ट्राची संकल्पना, धर्मशिक्षण आणि हिंदु राष्ट्र स्थापनेसाठी हिंदु जनजागृती समितीने आरंभलेले कार्य, यांविषयी महाकुंभपर्वातील समितीचे ग्रंथ आणि फलक प्रदर्शन युवकांना भावले. शास्त्रीय भाषेत धर्माचे स्वरूप, प्राचीन भारतीय संस्कृती आणि हिंदु राष्ट्राची संकल्पना समजून घेण्यासाठी युवक-युवती उत्सूक असल्याचे यावरून दिसून आले. कुंभक्षेत्री सेक्टर ६ मधील कैलासपुरी-भारद्वाज मार्ग चौकात असलेल्या या प्रदर्शनाला आतापर्यंत सहस्रो युवक-युवतींनी भेट देऊन हिंदु जनजागृती समितीचे कार्य समजून घेतले आहे. यांतील अनेकांनी समितीच्या धर्मकार्यात सक्रीय सहभागी होण्याची सिद्धताही दर्शवली.

महाकुंभमेळ्यामध्ये विविध राज्यांतून विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या युवकांनी कुंभपर्वात आल्यावर हिंदु जनजागृती समितीच्या या प्रदर्शनाला आवर्जून भेट दिली. सामाजिक माध्यमांद्वारे प्रदर्शनातील फलकांचा प्रचार करण्यासाठी सर्वच युवकांनी स्वतःच्या भ्रमणभाषमध्ये प्रदर्शनातील फलकांची छायाचित्र काढली. प्रदर्शन पाहून झाल्यावर 'सेल्फी पॉईंट'वर 'जयतु जयतु हिंदुराष्ट्रम्'च्या घोषणा देऊन भाविकांनी स्वतःची छायाचित्रेही काढली. प्रदर्शनाला भेट दिलेल्या धर्मप्रेमींनी नोंदवलेल्या प्रतिक्रियेमध्ये भारत हिंदु राष्ट्र घोषित करण्याच्या मागणीला पाठींबा दर्शवला आहे.




**'हिंदु राष्ट्र का हवे ?', या ग्रंथाला सर्वाधिक मागणी !**

प्रदर्शनामधील 'हिंदु राष्ट्र का हवे ?', 'हिंदु राष्ट्र : आक्षेप आणि खंडन' आदी ग्रंथांना भाविकांची सर्वाधिक मागणी होती. प्रदर्शनामध्ये बांगलादेशातील हिंदूंवर, तसेच काश्मिरी हिंदूंवर झालेल्या अनन्वित अत्याचारांची वस्तूस्थिती मांडण्यात आली आहे. हिंदु संतांच्या हत्या, तसेच लव्ह जिहादची भीषणता यांचे वास्तव पाहून हिंदूंमध्ये जागृती निर्माण होत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. हे प्रभावी प्रदर्शन आपापल्या जिल्ह्यात लावण्याची सिद्धता धर्मप्रेमींनी उत्स्फूर्तपणे दर्शवली. आपापल्या भागात स्वरक्षण प्रशिक्षण चालू करणे, धर्मशिक्षणवर्गाच्या आयोजनासाठी प्रयत्न करणे अशा प्रकारे हिंदु जनजागृती समितीच्या कार्यात सहभागी होण्याची सिद्धताही अनेकांनी दर्शवली.

# पं.प्रभाकर कारेकर यांचे निधन




चंद्रिका ही जणू राधाधरमधुमिलिंद जयजय, नभमेघांनि आक्रमिले, भाली चंद्र असे धरिला, बहुत दिन नच भेटलो अशा नाट्यपदांमधून आपल्या स्वरांची अनोखी झलक रसिकांच्या मनात कोरून ठेवणारे शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचे बुधवारी रात्री शिवाजी पार्क येथील राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. गुरुवारी संध्याकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, विवाहित मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. गोव्यामध्ये जन्मलेल्या पं. कारेकर यांच्यावर घरातील भजनी परंपरेचे संस्कार झाले. गोव्यामध्ये त्यांनी गायनकला सादरीकरणास सुरुवात केली. त्यानंतर पं. सुरेश हळदणकर यांच्याकडे मुंबईत येऊन शिकायला त्यांनी सुरुवात केली. पं. जितेंद्र अभिषेकी, पं. सी. आर. व्यास यांच्याकडे त्यांनी गायनाचे शिक्षण घेतले. कारेकर यांना एक आघाडीचे कलाकार आणि एक चांगले शिक्षक म्हणून ओळखले जात होते. गाण्याचे शिक्षण झाल्यानंतर त्यांनी छोटे-मोठे गाण्याचे कार्यक्रम, मैफली करायला सुरुवात केली. गणेशोत्सवातही कार्यक्रम व्हायला लागले. ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनसाठी त्यांनी अनेक कार्यक्रम केले. या माध्यमांवरील ते लोकप्रिय कलाकार होते. दिल्लीहून प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय कार्यक्रमांत आणि आकाशवाणी संगीत संमेलनांत त्यांनी आपले गायन सादर केले होते. त्यांना आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून गायन सादर करण्याची संधी मिळाली.

### सुवर्णयुगाचा साक्षीदार

पं. प्रभाकर कारेकर आमच्या बुवांचा शिष्य. तो माझा ज्येष्ठ गुरुबंधू, अभिषेकीबुवांच्या अनेक मैफलीमध्ये तो साथीला होता. या मैफलीमधून तोही शिकत होता. त्याने स्वरसाथीने या मैफली अविस्मरणीय केल्या. माझा त्यांच्याशी सांगीतिक संवाद होता, आमची रागचर्चा, बंदिशींवर चर्चा व्हायची. ते गाण्यांचे सुवर्णयुग होते. कुमारजी, भीमसेनजी, बुवा, जसराजजी असे सगळे दिग्गज असताना प्रभाकरने स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते. त्याने स्वतःचे वेगळेपण राखले होते. रूपाल, नाट्यसंगीत हे ज्या प्रभुत्वाने सादर करे, ते कौतुकास्पद होते. त्याला उत्तम आवाजाची देणगी होती.

**- राजा काळे, ज्येष्ठ गायक**

# थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज



आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब - श्रीमंत, स्त्री - पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ठाणे मनपाच्या पर्यावरण स्पर्धेत थिराणी विद्यामंदिर प्रथम

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले विद्यार्थ्यांचे कौतुक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातर्फे पर्यावरण जागृती निमित्ताने ' वृक्षवल्ली 2025 ' अंतर्गत रेमंड कंपनीच्या मैदानात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ठाण्यातील अनेक शाळांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी रांगोळी स्पर्धेत थिराणी विद्यामंदिरातील प्रयोगशाळा सहाय्यक सुनील कुमावत यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. मुलींच्या गटात कुमारी प्रतीक्षा कोमरेकर, समीक्षा देशमाने आणि अनन्या परब या विद्यार्थ्यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. शाळा विभागातून ' जपवणूक सप्तरंगाची' (जीवन शाळा ) या प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. प्रदर्शनास महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार संजय केळकर यांनी भेट दिली असता प्रकल्पतील सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



सदर प्रकल्पास सहशिक्षिका छाया बांबळे यांनी मार्गदर्शन केले. शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल वर्तकनगर शिक्षण मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक पी.एम परदेशी, पर्यवेक्षिका सुचिता पारखे इत्यादींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रक्तदान शिबिरास तरुणांचा प्रतिसाद

## उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्ताने शिवसेना-युवासेना स्वा. सावरकर नगर, म्हाडा वसाहत यांचे संयुक्त विद्यमाने वीर सावरकर नगर, ठाणे येथे शाखाप्रमुख हितेंद्र लोटलीकर, उपविभागप्रमुख अमित लोटलीकर, विजय देवळेकर, महिला शाखाप्रमुख श्रीमती विद्या कोवारकर यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रकतदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिरास तब्बल 92 रक्तदात्यांनी रक्तदान करून प्रचंड असा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी शिबिरास शिवसेना उपनेते, आमदार रविंद्र फाटक, विभागप्रमुख / माजी नगरसेवक एकनाथ भोईर, कोपरी पाचपाखाडी विधानसभा प्रमुख अनिल भोर, ऋषिकेश मानेआणि माजी नगरसेवक दशरथ पालांडे, नगरसेविका कांचन चिंदरकर, समाजसेवक विजय चिंदरकर, समाजसेवक राकेश शिंदे सह शिवसेनेचे अनेक नेते मान्यवर उपस्थिती होते.



# आर.बी.कारीया शाळेच्या विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनला भेट देत केली पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : श्री आर.बी. कारीया इंग्लिश स्कूलने प्राचार्य दिपाली राजपूत आणि विषय शिक्षिका रेणुका पाटील यांच्यासमवेत शाळेतील विद्यार्थ्यांनी महात्मा फुले पोलीस स्टेशनला "सिव्हिक क्वेस्ट: बिहाइंड द बॅज" चे आयोजन करण्यासाठी भेट दिली आणि कायदा आणि सुव्यवस्थाची माहिती घेतली.

महात्मा फुले पोलिस स्टेशनमधील अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी पीएसआय संतोष चौधरी, ममता मुंजाल आणि हेड कॉन्स्टेबल दत्तात्रय देसाई यांच्याकडून मौल्यवान अंतर्दृष्टी मिळाली. कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित विभागांबद्दल शिक्षित करण्यासाठी माहिती दिली.




संवादात्मक सत्रामध्ये महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता. यामध्ये बाल शोषण प्रतिबंध, सायबर क्राईम जागरूकता, गुन्ह्यांच्या तक्रारी दाखल करणे, रेकॉर्ड ठेवण्याची प्रक्रिया (ऑनलाइन आणि ऑफलाइन) याबाबत माहिती देण्यात आली. पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना आणि मार्गदर्शन करताना दाखवलेल्या संयम आणि समर्पणाची शाळेने प्रशंसा केली. त्यांची प्रेरणा आणि प्रोत्साहन विद्यार्थ्यांना भविष्यात जबाबदार आणि चांगले नागरिक बनण्यासाठी प्रेरणा देईल अशी प्रतिक्रिया प्राचार्य दिपाली राजपूत यांनी दिली.

# अंबरनाथ मध्ये म्हाडा बांधणार घरे

## २८ फेब्रुवारीपर्यंत सहभाग नोंदवण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई: म्हाडा कोकण मंडळातर्फे ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील कोहोज संुटवली व शिवगंगा नगर येथे अत्यल्प व मध्यम उत्पन्न गटांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा वर्धनक्षमता अहवाल सादर करण्याआधी, संभाव्य मागणीचा अंदाज घेण्यासाठी मंडळातर्फे ऑनलाईन मागणी निर्धारण सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने या सर्वेक्षणात सहभागी होऊन आपला अभिप्राय द्यावा, असे आवाहन म्हाडा कोकण मंडळातर्फे करण्यात आले आहे. अंबरनाथमधील कोहोज खुंटवली येथे प्रस्तावित गृहनिर्माण प्रकल्पात अत्यल्प उत्पन्न गटासाठी १६०६ सदनिका व २२ दुकाने, तर शिवगंगा नगर येथील प्रकल्पात अत्यल्प उत्पन्न गटासाठी १५१ व मध्यम उत्पन्न गटासाठी ७७४ सदनिका बांधण्यात येणार आहेत. या प्रकल्पांमध्ये नागरिकांकडून किती प्रतिसाद मिळू शकतो, हे आणून घेण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत है सर्वेक्षण सुरू राहणार असून, या ऑनलाईन सर्वेक्षणात सहभागी होण्यासाठी इच्छुक अर्जदारांनी https://demandassessmentcitizen.mhada.gov.in/संकेतस्थळावर जाऊन अपेक्षित माहिती भरायची आहे. तसेच अधिक माहितीसाठी म्हाडा कोकण मंडळाच्या ०२२-६६४०५२४९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन मंडळाने केले आहे. ज्याठिकाणी हे गृहनिर्माण प्रकल्प उभारले जाणार आहेत त्याठिकाणाचे गूगल लोकेशन जाणून घेण्यासाठी क्यूआर कोडही तयार करण्यात आले आहेत. कोहोज खुटवली प्रकल्पाचे गूगल लोकेशन जाणून घेण्यासाठी https://maps.app.goo.gl/VjMSEFRLLUqzRWYZA या लिंकवर क्लिक करावे म्हाडा MHADA तसेच शिवगंगा नगर प्रकल्पाचे गूगल लोकेशन आणून घेण्यासाठीhttps://maps.app.goo.gl/T4yeRUGMsbb2tR/SA या लिंकवर क्लिक करावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
संपर्क : ९०८२६६४७८१
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतीक्षा रवींद्र घोडविंदे
www.jeevandeepvarta.com/
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

# धारावीचा रखडलेला पुनर्विकास प्रकल्प मार्गी लागणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मागील काही महिन्यांपासून नवभारत मेगा डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेडच्या (एनएमडीपीएल) माध्यमातून धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील घरांचे सर्वेक्षण सुरू आहे. आतापर्यंत धारावीतील ८५ हजार सदनिकांना क्रमांक देण्याचे काम एनएमडीपीएलने पूर्ण केले. ५० हजार घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीचा रखडलेला पुनर्विकास अखेर आता मार्गी लागत आहे. या पुनर्विकासाअंतर्गत धारावीकरांची पात्रता निश्चिती करण्यासाठी एनएमडीपीएलकडून मार्च २०२४ पासून सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. सुरुवातीला या सर्वेक्षणास धारावीकरांकडून तीव्र विरोध झाल्याने काही ठिकाणी सर्वेक्षण बंद ठेवावे



लागले. मात्र मागील काही महिन्यांपासून सर्वेक्षण वेगात सुरू असून सर्वेक्षण करणारी पथके वाढविण्यात आली आहेत. या पथकांच्या माध्यमातून आतापर्यंत ८५ हजार घरांना क्रमांक देण्याचे काम पूर्ण करण्यात आल्याची माहिती डीआरपीकडून देण्यात आली. बुधवारी ५० हजार घरांचे सर्वेक्षण पूर्ण करून एनएमडीपीएलने एक मोठा टप्पा पार केल्याचेही डीआरपीकडून सांगण्यात आले.

दरम्यान, २००७-०८ मध्ये मशाल संस्थेने धारावीत सर्वेक्षण केले होते. त्यावेळी ६० हजार झोपडीधारक पुनर्वसनासाठी पात्र ठरले होते. दरम्यानच्या काळात घरांच्या संख्येत वाढ झाल्याने अंदाजे दीड लाख धारावीकरांचे पुनर्वसन धारावी पुनर्विकास योजनेअंतर्गत करावे लागण्याची शक्यताही डीआरपीकडून व्यक्त करण्यात आली आहे. पोटमाळ्यावरील रहिवाशांना, अपात्र रहिवाशांनाही पुनर्वसन योजनेत समावून घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने रहिवाशांची संख्या वाढणार आहे. पात्र आणि अपात्र रहिवासी किती असतील, किती रहिवाशांचे पुनर्वसन करावे लागेल हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट होईल.

सर्वेक्षण वेगाने पूर्ण व्हावे यासाठी धारावीकरांनी सहकार्य करावे. काही कारणामुळे सर्वेक्षण होऊ न शकलेल्या रहिवाशांनी पुढे येऊन लवकरात लवकर सर्वेक्षण करून घ्यावे, असे आवाहन यानिमित्ताने डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी केले आहे. पात्रता निश्चितीच्या दृष्टीने हे सर्वेक्षण खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे पुनर्वसनातून कोणीही वगळले जाऊ नये यासाठी रहिवाशांनी सर्वेक्षणात सहभागी व्हावे असेही त्यांनी स्पष्ट केले.



# वसईतील न्यू इंडिया बँक बंद? ग्राहक चिंताग्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : न्यू इंडिया को-ऑपरेटीव्ह बँक बंद झाल्याने ग्राहक हवालदील झाले आहेत. शुक्रवार सकाळी बँक बंद झाल्याचे समजताच सकाळपासूनच ग्राहकांनी बँकेच्या वसई आणि विरार शाखेच्या बाहेर गर्दी केली. परिस्थिती चिघळू नये यासाठी पोलिसांनी बँकेबाहेर बंदोबस्त ठेवला होता. आपले पैसे नक्की मिळतील का? याची चिंता ग्राहकांना सतावत होती. संतप्त महिलांनी तर बँकेत्या कर्मचाऱ्यांवर आपला राग काढला. गुरूवारी संध्याकाळी रिझर्व्ह बँकेने न्यू इंडिया को-ऑपरेटीव्ह बँकेवर निर्बंध आणले. यामुळे बँक ग्राहकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. वसईच्या पारनाका आणि विरारच्या विराट नगर येथे बँकेच्या शाखा आहेत. हे समजताच शेकडो ग्राहकांनी बँकेच्या बाहेर एकच गर्दी केली. यामुळे तणाव निर्माण झाला होता.

पोलिसांनी खबरदारी म्हणून दोन्ही शाखांच्या बाहेर पोलीस बंदोबस्त तैनात केला. बँकेच्या कर्मचाऱ्यांना ग्राहकांच्या संतापाला तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून आले.

# सरकारचा काटकसरीवर भर

## लोकप्रिय घोषणांचा फटका



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणांमुळे चालू आर्थिक वर्षात मार्चअखेर महसुली आणि भांडवली खर्चात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला . सरकारी वाहनांच्या इंधनावरील खर्चातही २० टक्के कपात करण्याची वेळ सरकारवर आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा घोषणांमुळे दोन लाख कोटींपेक्षा अधिकची वित्तीय तूट, पुरेशा निधीचा अभाव यामुळे सरकारला आखडता हात घ्यावा लागत आहे.

खर्च वाढला तरी राज्याची आर्थिक परिस्थिती भक्कम असल्याचा निर्वाळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार हे वारंवार देत होते. पण खर्चासाठी पुरेसे पैसेच उपलब्ध नसल्याने भांडवली खर्चात ३० टक्के कपात सरकारला करावी लागली आहे. सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू असताना आवश्यक खर्चासाठी निधीची उपलब्धता लक्षात घेता मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ७० टक्के रक्कम खर्च करण्यात यावी, असा आदेश काढण्यात आला आहे.

### इंधन खर्चालाही कात्री

वाहनांच्या इंधन खर्चात अनेक वर्षांनी कपात करण्यात आली आहे. बक्षीस वितरण, विदेश प्रवास, प्रकाशन, संगणक खर्च, जाहिरात, बांधकामे, कंत्राटी सेवा, सहायक अनुदान, मोटार वाहन यासाठीच्या निधी वितरणाचे प्रस्ताव प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला याची खात्री करूनच १८ फेब्रुवारीच्या आत संबंधित विभागांना वित्त विभागाकडे पाठवावे लागणार आहेत. खर्च न होणारा निधी क्षेत्रीय अधिकारी, मंडळे आणि महामंडळांच्या बँक खात्यात ठेवता येणार नसल्याचे वित्त विभागाने स्पष्ट केले आहे.

### लोकप्रिय घोषणांचा फटका

विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावण्यात आला होता. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. सुमारे एक लाख कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. यातून वित्तीय तूट दोन लाख

**राज्य सरकारकडून खर्चात ३० टक्के कपातीचे निर्देश**

- खर्चावर मर्यादा
- एकूण तरतुदीपैकी खालील प्रमाणात खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
- वेतन – ९५ टक्के, पाणी, वीज, दूरध्वनी – ८० टक्के, कंत्राटी सेवा – ९० टक्के
- कार्यालयीन खर्च – ८० टक्के, व्यावसायिक सेवा – ८० टक्के

कोटींवर गेली आहे. या पार्श्वभूमीवर खर्चात कपात करण्याशिवाय पर्याय नव्हता, असे सांगण्यात आले.

### ४७ टक्केच रक्कम खर्च

अर्थसंकल्पीय वर्षाच्या अखेरीस तरतूद केलेल्या निधी खर्चावर सर्व विभागांचा भर असतो. १२ फेब्रुवारीपर्यंत सरकारने ८ लाख २३ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींपैकी ६ लाख १८ हजार कोटी रुपये वितरित केले आहेत, प्रत्यक्षात खर्च ३ लाख ८६ हजार कोटी रुपये म्हणजेच अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ४६.८९ टक्के खर्च झाला आहे. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या उरलेल्या कालावधीत सर्व विभागांकडूनच खर्चावर मर्यादा घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे वित्तीय तूट मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न वित्त विभागाकडून करण्यात येत आहे. यंदा सुमारे ५ लाख १० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे खर्चात कपात केली तरच वित्तीय तूट कमी होण्याची शक्यता आहे.

या योजनांना वगळले : सर्व विभागांच्या खर्चाला कात्री लावण्यात आली असली तरी जिल्हा वार्षिक योजना, आमदार स्थानिक विकास निधी, केंद्र पुरस्कृत योजनांतील केंद्र व राज्य हिस्सा यांची निधी वितरणाची मर्यादा १०० टक्केच ठेवण्यात आली आहे. याच बरोबर शिष्यवृत्ती, विद्यावेतन, कर्ज, व्याज, आंतरलेखा हस्तांतरणे, निवृत्तिवेतनविषयक खर्च यांनाही १०० टक्के निधी वितरणाची परवानगी देण्यात आली आहे.

# दिल्ली साहित्य संमेलनात पत्रकार संघाचा स्टॉल

**मुंबई मराठी पत्रकार संघाच्या आणि मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासातील एक आगळावेगळा योग यंदा दिल्ली येथे आयोजित मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने जुळून आला आहे. मराठी पत्रकाराच्या साहित्याचा ठसा आता थेट दिल्लीत उमटणार आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठी पत्रकारांच्या साहित्याचा ठसा दिल्लीत उमटणारदिल्लीतील अ. भा. मराठी साहित्य संमेलनात प्रथमच मुंबई मराठी पत्रकार संघाचा स्टॉलमराठी पत्रकारांच्या हितासाठी सातत्याने सक्रीय असणाऱ्या मुंबई मराठी पत्रकार संघाच्या आणि मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासातील एक आगळावेगळा योग यंदा दिल्ली येथे आयोजित मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने जुळून आला आहे. मराठी पत्रकाराच्या साहित्याचा ठसा आता थेट दिल्लीत उमटणार आहे.आपल्या पत्रकार संघाच्या सदस्यांच्या सर्जनशील प्रतिभेचे धुमारे वाचकांसमोर आणणाऱ्या पुस्तकांचे म्हणजेच आपल्या मान्यवर सदस्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे एक प्रदर्शन मुंबई मराठी पत्रकार संघाने या संमेलनस्थळी आयोजित केले आहे. पत्रकार संघासाठी नवनवीन उपक्रमांची आखणी आणि आयोजन करणाऱ्या विद्यमान कार्यकारिणीच्या सक्रीय पाठबळामुळे हे आयोजन होत आहे.संमेलनाची आमंत्रक संस्था "सरहद" आणि संस्थेचे प्रमुख संजय नाहर यांनी अत्यंत आपुलकीने या आयोजनासाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे.

दिल्लीत तालकटोरा स्टेडियम येथे दि. २१ ते २३ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत संपन्न होणाऱ्या साहित्य संमेलनात आपल्या पत्रकार संघाचा लक्षवेधी स्टॉल क्र. ९४ साहित्यप्रेमींचे लक्ष निश्चितच वेधून घेणार आहे. पत्रकार संघाचे सदस्य असलेल्या पत्रकारांनी लिहिलेले प्रत्येकी एक पुस्तक या स्टॉलवर असावे, असे आयोजन करण्यात येत आहे. या स्टॉलची जबाबदारी पत्रकार संघाचे अंतर्गत हिशोब तपासनीस प्रा. हेमंत सुधाकर सामंत आणि सदस्य राजेंद्र साळस्कर हे सांभाळणार आहेत. या प्रदर्शनात मांडण्यासाठी सदस्यांनी 'आपल्या पुस्तकांपैकी कुठल्याही एकाच पुस्तकाची प्रत दि. १६ फेब्रुवारीपर्यंत मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात आणून द्यावी ही विनंती. असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईच्या वायप्रदूषणात भर

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून पीयूसी काढण्याच्या सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : वाहनांमधून निघणारा धूर व या धुरामुळे होणाऱ्या वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वाहनचालकांना वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) काढण्याच्या सूचना दिल्या जातात. मात्र तरी देखील शहरात मोठ्या प्रमाणात पीयूसी प्रमाणपत्र नसलेली वाहने निदर्शनास आली असून यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या ९ महिन्यांच्या कालावधीत तब्बल ३१७३ वाहनांवर कारवाई करत दंडवसुली केली आहे. शहरातील नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. रस्त्यावर वाहने देखील तेवढ्याच प्रमाणात धावत आहेत. शहरातील वायुप्रदूषणाचे प्रमाण वाढले असताना आता पीयूसी नसलेल्या वाहनांचा धूर प्रदूषणासाठी कारणीभूत ठरत आहे. सर्रास विनापीयूसी वाहने शहरात धावताना दिसून येत आहेत. या वाहनांमधून हायड्रोकार्बन, कार्बन मोनाक्साईड असे विषारी वायू मोठ्या प्रमाणावर बाहेर सोडले जातात. त्याला आळा घालण्यासाठी सर्व प्रकारच्या वाहनांना पोल्युशन टेस्ट सर्टिफिकेट (पीयूसी) बंधनकारक करण्यात आले आहे. एखाद्या वाहनांमधून पर्यावरणाला हानिकारक असे विषारी वायू बाहेर सोडला जात नाही ना यासाठी पीयूसी प्रमाणपत्र दिले जाते.

प्रत्येक वाहन चालकांकडे शासन मान्यता प्राप्त सेंटरवर तपासणी करून मिळवलेले प्रमाणपत्र व ते वाहन चालवताना सोबत बाळगणे आवश्यक आहे असे असताना देखील आजही शहरात पीयूसी प्रमाणपत्र तसेच वाहनांमधून विषारी वायू बाहेर सोडणारे वाहने आढळली आहेत. नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कडून एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या ९ महिन्यांच्या कालावधीत तब्बल ३१७३ वाहनांवर कारवाई करत १०,६६,९०० रुपये दंड वसुली करण्यात आलेली आहे.

एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यानच्या कालावधीत ४९३ वाहने तपासली असून त्यापैकी ११७ वाहने दोषी आढळली आहेत. यांच्यावर कारवाई करत ६०००० रुपये दंड वसूली करण्यात आली आहे.

पियुसी प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांवर तसेच काही वाहनांकडे पीयूसी प्रमाणपत्र आहे, मात्र त्यांच्या वाहनांमधून अतिरिक्त धूर बाहेर पडत आहे, अशा वाहनांची चाचणी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच शहरातील हॉर्नच्या कर्कश आवाजाने ध्वनी प्रदूषणात भर पाडणाऱ्या बुलेट सायलेन्सरचा धुमाकूळ घालणाऱ्या वाहनांवर देखील कारवाई करण्यात आली आहे.गजानन गावंडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी



### बुलेटच्या सायलेन्सरला ब्रेक

**तरुणाईमध्ये बुलेटची क्रेझ वाढल्याचे चित्र असून, फटफट आवाज करीत एकमेकांच्या वेगाशी स्पर्धा करणारे अनेक बुलेटचालक शहरभर धुमाकूळ घालत असतात. बुलेटचा सायलेन्सर हा परिवहनाच्या नियमानुसार बसविलेला असतो मात्र काही ग्राहक विकत घेतल्या नंतर बाहेरून बुलेटची दुरुस्ती करणाऱ्या फिटरकडून हा बदल करून घेतात. यामध्ये सायलेन्सर बदलला जातो किंवा त्यावर रबर ट्रॅप बसविला जातो त्यामुळे अचानक 'फट्ट' असा फटाक्यासारखा मोठा आवाज होतो. वाहन चालविताना वाहनांमधून किमान ८०डेसीबीलपर्यत आवाज नियमात आहे. मात्र शहरातील रस्त्यावर धावणाऱ्या बुलेटचा आवाज हा ८०ते ९० डेसीबल असतो. बुलेटच्या सायलेन्सरमध्ये करण्यात येणारा हा बदल पूर्णतः बेकायदा आहे. त्यापेक्षाही रस्त्यावर वाहतूक सुरू असताना अचानक सायलेन्सरमधून 'फट्ट' असा मोठा आवाज होत असल्याने रस्त्यावरील इतर वाहनचालक दचकतात. अशा वेळेस अपघात होण्याची शक्यता असते.**

# पालघर जिल्हा ग्राहक मंच महिनाभरात सुरु करा

## उच्च न्यायालयाचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


पालघर : पालघर जिल्हा मुख्यालय संकुलात स्थापन करण्यात आलेल्या पालघर जिल्हा ग्राहक मंच चार आठवड्याच्या आत कार्यरत करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला आज दिले. मुंबई उच्च न्यायालयाने आज पालघर जिल्ह्यात जिल्हा ग्राहक मंच स्थापन करण्याची मागणी करणाऱ्या दत्ता रानबा अडोदे यांच्यातर्फे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेचा निकाल दिला. चीनचे वाढते वर्चस्व रोखण्यासाठी अमेरिकेला भारताची मोठी गरज ; डॉ. अनंत लाभसेटवार यांचे मत ४ फेब्रुवारी २०२५ च्या सरकारी अधिसूचनेनुसार, पालघर येथे जिल्हा ग्राहक मंच आधीच स्थापन करण्यात आला आहे. ग्राहक मंचाच्या कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करण्यासाठी सरकारने १० फेब्रुवारी २०२५ रोजीची अधिसूचना जारी केली आहे असे या खटल्याच्या सुनावणीदरम्यान राज्य सरकार तर्फे वकिलानी असे सादर केले.

मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने ग्राहक मंचाचे कामकाज कधी सुरू होईल असा प्रश्न विचारला. त्याच्या उत्तरात राज्य वकिलांनी असे उत्तर देताना ग्राहक मंचासाठी कर्मचारी दोन आठवड्यात उपलब्ध करून दिले जातील अशी माहिती दिली. राज्याच्या युक्तिवादांना लक्षात घेऊन न्यायालयाने याचिका निकाली काढली. राज्य सरकारला चार आठवड्यांच्या आत पालघर जिल्हा ग्राहक मंच कार्यरत करण्याचे आणि त्याबाबत अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. पालघर जिल्हा मुख्यालय संकुलाच्या प्रशासकीय ब इमारतीत दालन क्रमांक १०१ मध्ये जिल्हा ग्राहक मंच करिता जागा निश्चित करण्यात आली असून पुढील महिन्याभरात हा मंच कार्यरत होईल असे उच्च न्यायालयाच्या आदेशावरून स्पष्ट झाले आहे.

# दलालांचा वावर कमी करण्यासाठी फेस रीडींग यंत्रणा

**'मंत्रालयात कोणी दलाली करताना आढळले तर कठोर कारवाई करणार', असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला आहे. मुळात मुख्यमंत्र्यांना असा इशारा द्यावा का लागला, हा सवाल अनेकांच्या मनात आहे. मंत्र्याचे खासगी सचिव, ओएसडी यांच्यावर स्कॅनर लावण्याची गरज मुख्यमंत्री महोदयांना भासली, याची कारणे कदाचित महायुतीच्या पहिल्या सरकारमध्ये दडलेली आहेत. त्या कारणांची पुनरावृत्ती झाली तर सरकारचा कडेलोट व्हायला फार वेळलागणार नाही याची जाणीव फडणवीसांना आहे.**

भक्कम बहुमत असूनही मविआचे सरकार का गडगडले, त्याचे एक महत्वाचे कारण भ्रष्टाचार हे आहे. आज महायुती सरकारकडे तसेच भक्कम बहुमत आहे. परंतु भ्रष्टाचारामुळे हे सरकार गोत्यात येऊ शकते याची जाणीव मुख्यमंत्री फडणवीस यांना आहे. विरोधी पक्ष नेता असताना या भ्रष्टाचारावरून त्यांनी मविआचे सरकार गोत्यात आणले होते. त्यामुळे ही बाब त्यांच्यापेक्षा चांगली कोणाला ठाऊक असणार ? ओएसडी आणि पीए यांनी दलाली करणे ही मंत्र्यांची सोय असते. मंत्री स्वच्छ असेल तर कोणता पीए दलाली करण्याचे धाडस दाखवेल ?



मंत्र्याला पैसे हवे असतात. तो थेट पैसे मागू शकत नाही, अपरिचित व्यक्तिकडून पैसे घेऊ शकत नाही, तिथे पीए किंवा ओएसडी कामाला येतात. त्यामुळे फक्त त्यांना चाप लावून काम भागणार नाही. नाक गळत असेल तर नाक बंद करून उपयोग होत नाही, त्याप्रमाणेच पीएना वेसण घालून भ्रष्टाचार बंद होत नाही. त्यासाठी मंत्र्यांना चाप लावण्याची गरज आहे.

महायुतीचे दुसरे सरकार हिंदुत्वाच्या नावावर आलेले आहे. भावना महत्वाची, परंतु त्यासोबत सरकारचा परफॉर्मन्सही महत्वाचा. लोकांना काम करणारे सरकार हवे आहे. मंत्रालयात बोकाळलेल्या दलालीमुळे पैसे देणाऱ्यांची काम होतात, जनता बाजूला राहते. या दलालांचे वैशिष्ट्य असे की सरकार कोणाचेही असो, दलाल तेच असतात. त्यांची या पीए आणि ओएसडी मंडळींशी घसीट असते. मविआच्या सत्ता काळात गृहमंत्री अनिल देशमुख यांना सीबीआयने अटक केली, त्यांचे खासगी सचिव संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे यांनाही गजाआड करण्यात आले. असे अनेक मंत्री आहेत, ज्यांचे पीए किंवा ओएसडी वर्षोनुवर्षे त्यांच्यासोबत असतात.

तुम्ही कोणत्याही पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असा, पदाधिकारी असा, मंत्रालयात तुमची किंमत नसते. कार्यकर्ते काम घेऊन आले की त्यांना नियम सांगितले जातात. कारण कार्यकर्त्यांकडून पैसे कसे मागायचे, हा मंत्र्यांसमोर प्रश्न असतो. पैसे मिळण्याची शक्यता नसते, मग त्याला पळवायचे, थकवायचे आणि अखेर नियमात बसत नाही, म्हणून टाळायचे, असा प्रकार सर्रास होत असतो. तेच काम दलालामार्फत गेले की नियम वाकवून वळवून कामे मार्गी लागतात. काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या काळात बिमल अगरवाल नावाचा दलाल जोरात होता. गुजरातमधल्या एका ईडीच्या अधिकाऱ्याची दलाली केल्याप्रकरणी त्याला तुरुंगवास झाला होता. स्थायी समितीचे माजी अध्यक्ष यशवंत जाधव यांची जेव्हा केंद्रीय तपास यंत्रणा चौकशी करत होत्या, तेव्हा त्यांच्यासोबतही याचे नाव आले होते. म्हणजे दलालांना पक्ष कोणता, यामुळे फरक पडत नाही. सर्वपक्षीय भ्रष्ट नेत्यांना हे दलाल त्यांच्या वाकण्याच्या आणि वाकवण्याच्या क्षमतेमुळे हवेहवेसे वाटतात.

काही दलाल मंत्रालयात बसलेले असतात, काही दलाल बाहेरचे असतात. हे दोन्ही दलाल मंत्र्यांसाठी काम करतात. त्यामुळे पीएस आणि ओएसडींना ताळ्यावर आणणे हे पहिले पाऊल. बाहेरच्या दलालांचा बंदोबस्त करण्यासाठी मंत्रालयात फेस रीडींगची यंत्रणा कार्यरत झालेली आहे. परंतु दलाली घेण्या देण्यासाठी मंत्रालयात येण्याची बंदी झाली तरी मंत्र्यांच्या बंगल्यात, फाईव्ह स्टार हॉटेलमध्येही हे प्रकार होतात. कुठे कुठे लक्ष ठेवणार? त्यासाठी मुख्यमंत्र्यांचा दराराच उपयोगी पडू शकतो. भ्रष्टाचाऱ्यांना मंत्रिमंडळात स्थान नाही, हे मुख्यमंत्र्यांना दाखवून द्यावे लागेल. दोन पक्ष सोबत असताना ते शक्य होईल का, याबाबत लोकांच्या मनात प्रश्न आहेत.

## महावितरणमधील दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहनांचे वितरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण: राज्य सरकारच्या निर्णयानुसार दिव्यांग कर्मचा-यांसाठी सहायक उपकरणे पुरवण्यात महावितरणच्या कल्याण मंडल-एक कार्यालयाने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या हस्ते गुरुवारी २३ फेब्रुवारी रोजी दोन कर्मचाऱ्यांना दुचाकीचे वितरण करण्यात आले. राज्य सरकारी सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे पुरवण्याबाबत सरकारने परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाप्रमाणे मागणी करणाऱ्या दोन कर्मचायांना दुचाकी पुरवण्याची प्रक्रिया पूर्ण करून राज्यात प्रथमच कल्याण मंडल-एक कार्यालयाने या उपक्रमात पुढाकार घेतला. दुचाकींचे वितरण करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात बोलताना मुख्य अभियंता मिश्रा म्हणाले, दिव्यांगांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज अधिक सुलभ करण्यासाठी सहायक उपकरणे महत्वाची ठरणार आहेत. या सुविधेमुळे शारीरिक अपंगत्व असले तरी मनाने खंबीर बनून दिव्यांग कर्मचारी अधिक प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच कल्याण परिमंडलातील इतर कार्यालयांनी दिव्यांग कर्मचायांना या उपक्रमाचा लाभदेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या प्रसंगी मानव संसाधन विभागाचे सहाय्यक व्यवस्थापक सुशिल पावसकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, प्रहार संघटनेचे अनिल गोसावी, सुप्रिम टीडीएसचे अनिल शहाजवाला यांच्यासह कार्यकारी अभियंते, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कल्याण परिमंडलात यापूर्वी चार दिव्यांग कर्मचायांना याच उपक्रमांतर्गत दुचाकीचे वितरण करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### आरटीई प्रवेशाची निवड यादी आज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई: शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी १० फेब्रुवारीला सोडत काढण्यात आली. त्यानुसार प्रवेशासाठीची निवड यादी शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) जाहीर करण्यात येणार आहे. सोडतीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारीपर्यंत प्रवेश घ्यावा लागेल. दिलेल्या मुदतीत विद्यार्थ्याला प्रवेश घेणे शक्य झाले नाही तर आणखी दोन संधी देण्यात येतील. तसेच पालकांना एसएमएसद्वारे सूचना देण्यात येणार असल्या, तरी त्यांनी वेळोवेळी आरटीई वेब पोर्टलवर दिलेल्या सूचना पाहाव्यात, असे आवाहन प्राथमिक शिक्षण संचालनालयाने केले आहे. आरटीई प्रवेश प्रक्रियेत यंदा १ लाख ९ हजार १११ जागांसाठी ३ लाख ५ हजार ८२८ अर्ज आले आहेत.

### शिवजयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : शिवजागर प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून सन २०१७ पासून दरवर्षी शिवजयंती साजरी करण्यात येते. या दिवशी छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या अनुपम विचारांचा तथा कर्तृत्वाचा जागर व्हावा या हेतूने संस्थेच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. आजवर सुप्रसिद्ध लेखक संजय सोनवणी, अरविंद जगताप, हरी नरके, राजू परूळेकर, असिम सरोदे आदी मान्यवरांनी या व्यासपीठाद्वारे आपल्या ज्ञानाची उधळण केली आहे. यंदा बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी, आनंद बालभवन, रामनगर, डोंबिवली (पूर्व) येथे सायंकाळी ५.३० वा. शिवजयंती निमित्त महेश पाटील, प्रा. विनय भोळे व रविंद्र पोखरकर यांचे व्याख्यान शिवजागर या संस्थे तर्फे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे सचिव धनंजय चाळके यांनी दिली.

### आंबेटेंबे येथे भिमाई महोत्सव साजरा




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : संविधानाचे निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोळ असलेल्या मुरबाड तालुक्यातील आंबेटेंबे येथे दि बुद्धीष्ट कल्चरल ट्रस्टच्या वतीने 171 वा जयंती मोहोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात झाला.

मुरबाड तालुक्यातील आंबेटेंबे येथील जन्मगावी साजरी होते. याच ठिकाणी शासनाच्या वतीने आंतराष्ट्रीय दर्जाचे भीमाई स्मारक प्रस्तावित आहे. प्रिया खरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच स्वागतध्यक्ष प्रमोद जाधव व रमेश जाधव होते. बुद्धवंदना सूत्रपटण व आठ सत्कारमूर्तींचा भीमाई पुरस्काराने साहित्यिक तसेच समाजसेवक यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सदम पत्रिकेचे संपादक आनंद देवडेकर व प्रमुख वक्ते होते. विचारपीठावर मुरबाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गिते, सरपंच रेश्मा घरत, जेष्ठ साहित्यिका ऋणा पवार, रिपाईचे जेष्ठ नेते अण्णा रोकडे, माधुरी सफाटे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून आरपीआयचे उपाध्यक्ष रमेश देसले, सामाजिक कार्यकर्ते महेद्र गायकवाड, संतोष उघडे व इतर मान्यवर उपस्थित होते. संयोजक म्हणून डॉ. स्मिता खरे, डॉ. वृषाली खरे, रिपाई मुरबाड तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, टिटवाळा आरपीआय शहर अध्यक्ष विजय भोईर, विवेक साळवी, राजेश खरे, संगीता जाधव, अशोक पंडित, सुहास सावंत यांनी कामे केली.

तर विशेष सहकार्य म्हणून महेंद्र गोविंद्र गायकवाड, स्वप्नील जाधव, योगेश उघडे, निखिल शिंदे, रवी पंडित हे होते. या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिमन्यू भालेराव यांनी केले. या प्रसंगी सभाअध्यक्ष प्रिया खरे, वरिष्ठ पोलीस अधिकारी संदीप गिते व कान्होळ बोरिवलीच्या सरपंच रेश्मा घरत यांनी आपले विचार मांडले.

# ठाणे महापालिकेचा घनकचरा प्रकल्प राज्यात पथदर्शी

### -परिवहन मंत्री श्री.प्रताप सरनाईक







दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

ठाणे : (14 फेब्रुवारी) मौजे भाईंदरपाडा(गायमुख )येथील ठाणे महापालिकेच्या जागेवर विकसित होत असलेल्या एरोबिक्स स्वयंचलित बायो कंपोस्टींग मशीन द्वारे ओल्या कचऱ्यापासून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प राज्यात पथदर्शी ठरेल असे प्रतिपादन परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी केले. ते ठाणे महापालिका हद्दीतील विकास कामांच्या पाहाणी दौऱ्याच्या प्रसंगी बोलत होते. यावेळी त्यांच्या बरोबर महापालिका आयुक्त सौरभ राव व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मौजे भाईंदरपाडा येथे ठाणे महापालिकेची सुमारे 4190 चौ.मी. क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. सध्या या जागेतील 1/3 जागेवर 90-100 टनांपर्यंत प्राप्त झालेल्या ओल्या कचऱ्यापासून पासून एरोबिक्स स्वयंचलित बायो कंपोस्टींग मशीन द्वारे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कंपोस्ट खतांची निर्मिती प्रकल्प सुरू आहे. उर्वरित जागेवर हा प्रकल्प विस्तारित करण्यात येणार असून सुमारे 300 टनांपर्यंतचा घनकचरा प्रकल्प उभारण्यासाठी महापालिकेने लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले. Lahs Green India Pvt Ltd. SOLARISED CONTROL WINDROW COMPOSTING (IIT PAWAI, MUMBAI PATENTED) technology द्वारे अशा प्रकारे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प राबविणारी ठाणे महापालिका देशातील पहिलीच महापालिका ठरणार आहे. या जोडीला Enviro Invent System Pvt. Ltd या कंपनीने बनविलेले Treatment Of The Waste On The Go (TOWGO vehicle) वाहनाद्वारे जागेवर एकावेळी सुमारे 2 टन ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करण्यात येते, अशी लवकर अजून 20 वाहने उपलब्ध होत आहेत. या पाहणी दौऱ्यात मंत्री सरनाईक यांनी स्वराज्याचे पहिले आरमार प्रमुख श्री.कान्होजी आंग्रे यांचे यथोचित स्मारक विकसित होत असलेल्या नांगला बंदराची देखील पहाणी केली. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, "प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या प्रत्येक आगरी-कोळी कुटुंबांचे सन्मानपूर्वक पुनर्वसन करण्यात यावे!" असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी महापालिका क्षेत्रातील विकास कामांला अडथळा ठरणाऱ्या अन्य जागेवरील अतिक्रमण निर्मूलन तातडीने करुन घ्यावे अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## नव्या कायद्यांसंदर्भात गणेशपुरी पोलसांचा पत्रकारांशी सुसंवाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

झिडके-अंबाडी : केंद्र सरकारने भारतीय संसदेमध्ये भारतीय न्याय संहिता 2023 (BNS),भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) व भारतीय साक्ष अधिनियम 2023 हे तीन नवीन कायदे पारित केले असून,त्यांची अंमलबजावणी होण्यासाठी आणि जनसामान्यांना नवीन कायद्यांची ओळख करून देण्यासाठी गणेशपुरी पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील पत्रकार यांच्याबरोबर सुसंवाद साधून आपली कामगिरी बजावली आहे.

पत्रकार दैनंदिन बातम्यांचे संकलन करीत असतानाच,विविध स्वरूपातील घटनांबद्दल पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हे नोंद केले जातात,भारतीय संसदेने नवीन तीन कायदे जे पारित केले आहेत,या नवीन कायदेविषयक पत्रकार यांना माहिती व्हावी यादृष्टीकोनातून ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.डी.एस्.स्वामी यांच्या मार्गदर्शन सूचनेवरून सहा. पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्याकडून पत्रकारांबरोबर सुसंवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळेस आतापर्यंत अगदी इंग्रज राज्यकारभारापासुन अस्तित्वात असणारी कायदेसंहिता म्हणजेच IPC (इंडियन पीनल कोड) नुसार 424 या गुन्ह्यासाठी नवीन कायद्याने 118 या कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात येईल.302 खुनाच्या गुन्ह्यात यापुढे 103 गुन्हा नोंदविण्यात येईल.376 बलात्कार या गुन्ह्यात यापुढे 64 या कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात येईल.अशा प्रकारे भारतीय संसदेने जे नवीन तीन कायदे पारित केलेले आहेत,त्यांची अंमलबजावणी पोलीस खात्याच्या अखत्यारीत असणाऱ्या कामकाजासाठी वापर केला जाणार आहे,याची माहिती लोकशाहीतील चौथा स्तंभ पत्रकार यांच्याकरिता आवश्यक बाब म्हणून पत्रकार सुसंवाद सभेचे उद्दिष्ट होते.यावेळेस पत्रकार-दीपक हिरे,विजय गायकवाड, विनोद पाटील,दीपक देशमुख,शिवाजी राऊत आदिंची उपस्थिती होती.

## अतिरिक्त ग्रामविकास अधिकाऱ्यांना कायम करा

### डोहोळे ग्रामपंचायतीची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /वासिंद :

येथील डोहोळे ग्रामपंचायत येथे सध्या अतिरिक्त पदावर कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी परेश सोनावणे यांना येथे कायम करावे अशी मागणी ग्रामपंचायत समितीनी सर्वानुमते ठराव घेऊन तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथजी शिंदे, स्थानिक आमदार शांताराम मोरे व जिल्हा परिषद ठाणे विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

डोहोळे हि एकूण पाच गावे असलेली ग्रुप ग्रामपंचायत आहे. सदर ग्रामपंचायती मध्ये कार्यरत असलेले ग्रामविकास अधिकारी राजाराम वनगा यांच्या ऐवजी ग्रामविकास अधिकारी परेश सोनावणे यांच्याकडे गेल्या एक-दिड वर्षांपासून ग्रामपंचायत प्रशासन अतिरिक्त पदभार आहे. या कालावधीत ग्रामपंचायत माध्यमातून झालेल्या विकासकामे व विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सोनावणे यांनी ग्रामपंचायत समिती बरोबर योग्य कामकाज केले आहे. तसेच ग्रामस्थांच्या असलेल्या नागरी समस्या व विकासात्मक कामे करुन या सर्वांगिण विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिल्याने महाराष्ट्र शासनाच्या ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागा कडून सन 2022 -23 या वर्षात आर.आर. (आबा) पाटील सुंदर गांव योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये निर्धारित निकषांनी ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायतीने सर्वाधिक गुण तालुका स्तरावर प्राप्त केल्याने नुकतेच या ग्रामपंचायतीला 'तालुका सुंदर गांव' पुरस्कार प्राप्त होऊन या पुरस्काराने गौरविण्यात आले असून जिल्हा पुरस्कार साठीही तपासणी झाली आहे. तर 'माझी वसुंधरा अभियान, घरकुल योजना यामध्येही ग्रामविकास अधिकारी म्हणून योग्य काम केले आहे असे ग्रामपंचायत समितीने निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, ग्रामपंचायत विभागांनी दिलेल्या निवेदना अनुसरून आमदार शांताराम मोरे यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना निवेदन देऊन सदरचे कार्यरत ग्रामविकास अधिकारी परेश सोनावणे यांचे कामकाज पहाता त्यांना या ग्रामपंचायतीमध्ये मुळ ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यभार देणेबाबत आदेश व्हावे असे सुचित केले आहे. तर ग्रामपंचायतीचे कामकाज पहाणारे ग्रामविकास अधिकारी राजाराम वनगा यांना पदोन्नती मिळणार असून त्यांच्या पदोन्नतीने सदर रिक्त होणाऱ्या या जागी सोनावणे यांना कायम करावे अशी मागणी ग्रामपंचायत समितीनी केली आहे.

## शैक्षणिक गुणवत्तेत हलगर्जीपणा नको – मनीषा आव्हाळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /उल्हासनगर

उल्हासनगर शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि शाळांची प्रत्यक्ष परिस्थिती तपासण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी गुरुवारी मनपा शाळांचा अचानक पाहणी दौरा केला. शाळांच्या भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेची तपासणी करण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या दौऱ्यात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. महापालिकेच्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी तत्कालीन आयुक्त विकास ढाकणे यांच्या सुरू केलेल्या 'आदर्श शाळा' उपक्रमाला पुढे चालना देण्यासाठी शाळांमध्ये भेट देऊन विविध बाबींची पाहणी केली. यावेळी त्यांनी शाळा क्रमांक ८, २९ आणि २३ मध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची तपासणी केली. वाचन कौशल्य चाचणी दरम्यान शाळा क्रमांक ८ मधील काही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये त्रुटी आढळून आल्याने त्या वर्गाच्या शिक्षिकेला कारणे दाखवा नोटीस दिली.

> पालिका शाळांमध्ये शिक्षणाच्या गुणवत्तेवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी जबाबदार शिक्षक आणि प्रशासनाने आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडली पाहिजे. शाळा पाहणी दौऱ्यादरम्यान काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, आणि त्यावर कठोर कारवाई केली जाईल.
>
> - मनिषा आव्हाळे, आयुक्त उल्हासनगर महापालिका

## पेण येथे पुलवामा हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

पेण : पेण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांनी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तानच्या माध्यमातुन अशा प्रकारचे पुण्यस्मरण केले जाते याचे मला तर अभिमान वाटतेच पण हे बघून कोणताही खाकी वर्दीला अभिमानच वाटेल असे सांगून पोलिस दलाच्या वतीने श्रद्धांजली वाहिली.

जम्मू काश्मीर श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर पुलवामा येथे भारतीय जवानांवर झालेल्या भ्याड हल्ल्याला आज सात वर्षे पूर्ण झाली असून त्या घटनेचे स्मरण ठेवून हल्ला झाल्यापासून दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान पेण आणि महात्मा गांधी वाचनालय यांच्या माध्यमातुन शहीदांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला पेणमधील माजी सैनिक सुरेंद्र ठाकुर, राजेन्द्र हटकर, वसंत पोईलकर, लहू पाटील, पेणचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल, पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष अॅड मंगेश नेने सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे कार्याध्यक्ष समीर म्हात्रे, नंदा म्हात्रे, दिपश्री पोटफोडे, योगेश पाटील विविध सामाजिक कार्यकर्ते,वकील, पोलिस अधिकारी व कर्मचारी, राजकिय पक्षांचे पदाधिकारी, शालेय विद्यार्थी, पत्रकार, जेष्ठ नागरिक, महिला वर्ग सुजाण नागरिक व देशभक्त उपस्थित होते.

यावेळी समीर म्हात्रे नंदा म्हात्रे, अॅड मंगेश नेने, माजी सैनिक सुरेंद्र ठाकुर यांनी आपली मते व्यक्त करत श्रद्धांजली वाहिली.

## प्रशांत माळींकडून गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. वंडार पाटील यांच्याहस्ते विधानसभा कार्याध्यक्ष प्रशांत माळी यांच्या वाढदिवसानिमित्त कल्याण शहरातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वही वाटप करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभा अध्यक्ष स्वप्निल रोकडे, जिल्हा उपाध्यक्ष विनायक काळन, उद्योजक मयूर तांडेल, महिला अध्यक्ष सुनीता देशमुख, बाजार समिती माजी सचिव रमाकांत देशमुख, समाजसेवक अनिल कर्पे, युवा सेनेचे अध्यक्ष सुजित रोकडे, राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष दर्शन देशमुख, युवा नेते योगेश माळी, समन्वयक सूचित डांबरे, शिवसेना विभाग प्रमुख चेतन म्हामुनकर, फुल मार्केटचे व्यापारी दाजी कदम, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष रामदास यादव, ज्येष्ठ व्यापारी नाना घुगे, युवा नेते गिरीश पाटील, समाजसेवक भावार्थ दौंड, आर्किटेक पडळकर, समाजसेवक आनंद दायमे, विजय कुंभार, भैरवनाथ वाघमारे, अजित रोकडे, कांबा गावचे उद्योजक छगन बनकरी, अमर बनकरी, रुपेश बनकरी, निलेश बनकरी, सतीश बनकरी आदींसह इतर अनेक जण माळी यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

## मानिवली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परीक्षेत यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

शहापूर ग्रामिण : जिल्हा परिषद शाळा, मानिवली येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा (एनएमएमएस) या परिक्षेत यश संपादन केले आहे.

गोवेली केंद्रांतील मानिवली जिल्हा परिषद शाळेत इयत्ता आठवीत शिकणाऱ्या लावण्या गोटीराम गायकर, सायली एकनाथ गायकर, मनस्वी दिनकर माळी, निधी विश्वनाथ गायकर, खुशी हरीचंद्र गायकर या पाच विद्यार्थ्यांनी या परिक्षेत उत्तीर्ण होऊन शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे दर्शन घडवले आहे.

विद्यार्थ्यांचे परिश्रम आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून यासाठी शाळेचे शिक्षक नंदू चौधरी, पूजा माळी, मंगल डोईफोडे, विजय प्रगणें, नाजूका गायकर यांचे मोलाचे मार्गदर्शन व शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य लाभले आहे. तर यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा ग्रामपंचायत सदस्य जगदीश धुमाळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा ज्योती नंदू गायकर यांनी सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान ,एनएमएमएस हि परीक्षा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी असते. या परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावीपर्यंत शिष्यवृत्ती मिळते ज्यामुळे त्यांचे पुढील शिक्षण सुलभ होते.

## बांधकामांसाठी पुनर्प्रक्रियाकृत पाणी मिळणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

नवी मुंबई: नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत सिडको विकसित धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाची त्याचप्रमाणे इतर खाजगी भूखंडावरील विकास कामे प्रगतीपथावर आहेत. सद्यस्थितीत सदर विकास कामांकरिता बहुतांशी पिण्यायोग्य पाण्याचा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. ही बाब विचारात घेऊन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे मार्गदर्शनानुसार नगररचना विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांसाठी आवश्यक असलेल्या ठिकाणी त्रिस्तरीय पुनर्प्रक्रियाकृत (Tertiary Treated) पाण्याचा वापर करणे विकासकांवर बंधनकारक करण्यात येत आहे. याविषयी नवी मुंबई महानगरपालिकेकडून दि.१२ फेब्रुवारी २०२५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होऊ नये यादृष्टीने पिण्याच्या वापराव्यतिरिक्त इतर वापराकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्रामधील प्रक्रियायुक्त पाणी उपलब्ध करून घेऊन त्याचा वापर बांधकामासाठी करणेबाबत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध नोडमध्ये कार्यरत असलेल्या अधिका-यां मार्फत कार्यवाही होत आहे. तरी उपरोक्त नमूद अधिकारी यांच्याशी संपर्क साधून सर्व विकासक व बांधकाम व्यावसायिकांनी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानुसार प्रक्रियाकृत पाणी बाधकामासाठी उपलब्ध करून घेऊन पिण्याच्या पाण्याची बचत करावी असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024